# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :-विकाअ/शिक्षण/संस्था स्थलांतरण/२०१५/२५५६

दिनांक १३/१०/२०१५

**प्रति,**
सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित संस्था,
अकोला जिल्हा.

**विषय :- भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्कचे सन २०१३-१४ व २०१४-१५ चे महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित असलेले अर्ज महाविद्यालयांनी दिनांक १०/१०/२०१५ पूर्वी सादर करण्याबाबत.**

**संदर्भ :-** सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण अकोला यांचे पत्र क्रमांक :- सआ/अकोला/भासशी/प्रलंबित अर्ज / २३१० / २०१५ दिनांक १९/९/२०१५.

उपरोक्त विषयान्वये आपणास सादर करण्यात येते की, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अकोला यांचे संदर्भीय पत्र जोडलेले आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे व त्या पत्रामध्ये दिलेल्या सुचनाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

परिपत्रक

जाक्र.सआ/अकोला/भासशि/प्रलंबितअर्ज/ /२०१५
कार्यालय- सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण,अकोला
अकोला. दिनांक. २९ सप्टेंबर २०१५

प्रति,

प्राचार्य,
..................................................
..................................................
..................................................

विषय :- भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क चे सन.२०१३-१४ व २०१४-१५ चे महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित असलेले अर्ज महाविद्यालयांनी दि.१० ऑक्टोबर २०१५ पूर्वी सादर करणेबाबत.

संदर्भ :- मा.आयुक्त,समाजकल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्र क्रमांक. सकआ/शिक्षण/प्रलंबित अर्ज/२०१५-१६/२०८७ दिनांक.२४/९/२०१५

उपरोक्त विषयाच्या अनुरोधाने सदर परिपत्रकाव्दारे आपणांस सुचित करण्यात येते की, अनुसूचित जाती,विजाभज,इमाव व विमाप्र प्रवर्गातील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क चे सन.२०१३-१४ आणि सन २०१४-२०१५ या वर्षाचे अर्ज ब-याच प्रमाणात आपल्या महाविद्यालयास्तरावर प्रलंबित असल्याचे डॅशबोर्डेवरुन निदर्शनास येते.याबाबत यापूर्वी कळविण्यांत आलेले आहेत.तसेच दिनांक.१८ जून २०१५ रोजी संपन्न झालेल्या आढावा बैठकीमध्ये सन.२०१३-१४ व २०१४-१५ या वर्षाचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबतच्या सूचना देण्यांत आलेल्या आहेत. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही आपले महाविद्यालयाकडून करण्यांत आलेली नाही.

सन.२०१३-२०१४ व सन.२०१४-१५ या आर्थिक वर्षातील जे अर्ज महाविद्यालयाकडे प्रलंबित आहेत त्यांचा निपटरा करण्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यांत येत आहे.

१) या दोन वर्षाचे अर्ज महाविद्यालयांना कोणत्याही परिस्थितीत दिनांक.१० /१०/२०१५पूर्वी सहाय्यक आयुक्त यांच्याकडे त्वरीत ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. व त्याबाबतचे विवरणपत्र "B" सह आवेदनपत्राची हॉडकॉपी सादर करावी.

२) सदर अर्ज महाविद्यालयांनी विहित कालर्यादेत फॉरवर्ड न केल्यास हे विद्यार्थी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्कासाठी पात्र नाहीत असे गृहीत धरुन हे अर्ज सिस्टीम वरुन काढून टाकण्यांत येतील.

३) सदरचे अर्ज अर्ज सिस्टिम वरुन काढून टाकल्यास विद्यार्थी शिष्यवृत्ती व शिक्षण फी परिक्षा फी मिळण्यापासून वंचित राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही महाविद्यालयाची असेल.

४) महाविद्यालयाने सन.२०१३-२०१४ व २०१४-२०१५ या दोन वर्षातील दिनांक.१०.१०.२०१५ पर्यंत अर्ज फॉरवर्ड न केल्यास आणि महाविद्यालयाकडे प्रंलबित असलेले अर्ज सिस्टिमवरुन काढून टाकल्यास विद्यार्थी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजनेचे पासून वंचित राहिल्यास अशा विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क

,परिक्षा शुल्काची रक्कम ही संबधित महाविद्यालयांना भरावी लागेल.त्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयांची असेल,याबाबत कोणत्याही विद्यार्थ्याची तक्रार प्राप्त झाल्यास त्याला संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील.

५) वांरवार सुचना देवून प्रलंबित अर्जाची संख्या प्रचंड असल्याचे दिसून आले आहे.सदर अर्ज शिष्यवृत्तीसाठी पात्र आहे याची माहिती या कार्यालयास मिळत नाही.त्यामुळे पात्र असलेले अर्ज महाविद्यालयांनी दिनांक.१० ऑक्टोबर २०१५ पर्यत विद्यार्थ्याच्या पात्रतेची खात्री करुन अनुक्रमांक (१) प्रमाणे कार्यवाही करुन निकाली काढण्यात यावेत.

सहाय्यक आयुक्त,
समाजकल्याण,अकोला.

प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर.

१) मा.आयुक्त,समाजकल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१
२) मा.संचालक,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१
३) मा.प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण,अमरावती विभाग अमरावती.
४) मा.सहसंचालक,उच्च शिक्षण,अमरावती विभाग अमरावती.
५) मा.सहसंचालक,तंत्रशिक्षण,अमरावती विभाग अमरावती
६) मा.उपसंचालक,शिक्षण,अमरावती विभाग अमरावती.

सहाय्यक आयुक्त,
समाजकल्याण,अकोला.

D:\gopal 1-Salim Letter new-.lwp-225